# अहमदनगर जिल्हयातील माध्यमिक शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिणदेणा-या यंत्रणा जिल्हा परिषद (माध्यमिक विभाग) व विस्तार सेवा केंद्र यांच्या कार्याचा अभ्यास.

**डॉ. अमरनाथ शांताराम कुमावत**

*सहाय्यक प्राध्यापक*

*विद्याप्रतिष्ठाण (महा.) संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अहमदनगर*

## १) प्रास्ताविक :-

कोणताही व्यवसाय करायचा असेल तर केवळ त्या व्यवसायाची आवड आणि अभियोग्यता असून भागत नाही, तर त्या व्यवसायात काम करण्यासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्य, अभिरुची, दृष्टीकोन असावा लागतो. शिक्षकी व्यवसायही त्याला अपवाद नाही. ज्या व्यवसायातून मानवी मने घडविण्याची त्याला सर्वांग दृष्टीने पूर्णत्त्वाकडे नेण्यासाठी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. शिक्षण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे. असे असतांना केवळ शिक्षकी व्यवसायाला आवश्यक असणारे केवळ बी.एड., डी.एड्. यासारखे प्रशिक्षण घेउन थांबले तर कसे भागेल ज्ञानाचा प्रस्फोट इतका प्रचंड आहे की, एखादी पदवी घेतली की, त्या शिदोरीवर आपली सर्व शैक्षणिक कारकीर्द पूर्ण करता येईल अशी परिस्थिती आज राहिलेली नाही.

अध्ययन, अध्यापन प्रक्रियेत अध्यापकाचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. ज्या प्रमाणे बालकाच्या जीवनात आईची जागा कोणीच घेऊ शकत नाही. त्याप्रमाणे या शैक्षणिक प्रक्रियेत अध्यापकाचे स्थान कोणीही घेउ शकत नाही. कारण प्रश्न संस्काराचा आहे. तेव्हा हा अध्यापक कसा असावा हा प्रश्न राष्ट्राच्या दृष्टीने भावी पीढी निर्मितीच्या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचा आहे. नव्या शैक्षणिक धोरणात याचा प्रकर्षाने विचार केला आहे. अध्यापन आता एक नुसते तोंडी कार्य राहिलेले नसून अत्यंत क्रियात्मक व तांत्रिक पध्दतीचे बनलेले आहे. हा नुसताच पेशा किंवा व्यवसाय नसून ही एक मोठी समाज सेवा आहे आणि हया वृत्तीनेच योग्य ती सामाजिक व नैतिक मूल्ये जपून ही सेवा करावयाची आहे म्हणून समाजाच्या अपेक्षांची माहिती व परिपूर्ती होण्यासाठी शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण देणे अपेक्षित व महत्वाचे आहे.

## २) संशोधनाची गरज व महत्व :-

आज माध्यमिक स्तराचा संस्थात्मक विकास झाला. पण त्या तुलनेत गुणात्मक विकास फार कमी आहे आणि हा गुणात्मक विकास वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजे. त्या दृष्टीने प्रशिक्षण देणा-या विविध यंत्रणा कार्यान्वित आहेत. केवळ यंत्रणा कार्यान्वित परंतु यंत्रणा कार्यान्वित करुन व शिक्षकांना प्रशिक्षण देउन ही समस्या दूर होणार नाही. कारण ''एकदा पदवीधर होउन व्यवसायात पाउल टाकले की, शिक्षकांचे अध्ययन संपले असे मानण्याची प्रवृत्ती आढळते, ही खेदाची गोष्ट आहे. शिक्षक हा जन्मभर विदयार्थी असतो, तो अध्ययनशील असतो वगैरे बाबी फक्त व्यासपीठावर बोलावण्याच्याच. वयाच्या ऐन पंचविशीत, ऐन उमेदीच्या काळात शिक्षकांच्या शिक्षणाला पूर्णविराम मिळावा याबद्दल १९४८ च्या राधाकृष्ण

आयोगाने खेद व्यक्त केला आहे.'' म्हणून प्रशिक्षणाची गरज ही शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य, तपासणी अधिकारी आणि प्रशासक या सर्वांच्याच दृष्टीने सेवांतर्गत प्रशिक्षण महत्त्वाचे व आवश्यक आहे.''

सेवातंर्गत प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होणा-या अध्यापकांचा दृष्टींकोन, त्यांची अभिवृत्ती हा एक विवादास्पद मुद्दा आहे. एक तर त्यांना जबरदस्तीने पाठविले जाते किंवा निवास व दैनिक भत्ता हे त्यांच्या आकर्षणाचे केंद्र असते किंवा या काय्रक्रमाबाबत त्यांच्या उदासिनता असते. आम्ही इतक्या वर्षापासून शिकवत आहोत आम्हाला असल्या कार्यक्रमापासून काय शिकायला मिळणार आहे अशी मानसिकता बदलण्याची गरज आहे म्हणून सेवांतर्गत प्रशिक्षण देणे महत्त्वाचे व आवश्यक आहे.

शिक्षकांच्या दैनंदिन अध्यापनातील दोष दूर करण्यासाठी, अध्यापन क्षमतेत सातत्याने वाढ करण्यासाठी व्यावसायिक कौशल्ये, व्यवसायाबाबत ओढ, अभिवृत्ती निर्माण करण्यासाठी नव्या आव्हानांना तोंड देण्यासाठी शिक्षकांजवळ असणा-या क्षमतांची जाणीव प्रशिक्षण यंत्रणांनी करुन घ्यावी व त्यांच्या इच्छेप्रमाणे, गरजेप्रमाणे सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजित केले जाते की नाही. त्यामध्ये प्रशिक्षण कालावधी, प्रशिक्षण कालखंड, प्रशिक्षणार्थींची संख्या, तज्ज्ञ मार्गदर्शका बद्दलची अपेक्षा, मुख्याध्यापकांचा दृष्टीकोन, शैक्षणिक संस्थांचा हातभार, प्रशासकीय अधिका-यांची भूमिका या सर्व गोष्टींचा विचार सेवांतर्गत प्रशिक्षणामध्ये केला जातो की नाही ते महत्वाचे व आवश्यक आहे.

**३) संशोधनाचे विधान :-**

अहमदनगर जिल्हयातील माध्यमिक शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण देणा-या यंत्रणा जिल्हा परिषद (माध्यमिक विभाग) व विस्तार सेवा केंद्र यांच्या कार्याचा अभ्यास.

**४) संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. अहदमदनगर जिल्हयातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शिक्षकांनी जिल्हापरिषद (माध्यमिक विभाग) व विस्तार सेवा केंद्र या सेवांतर्गत प्रशिक्षण यंत्रणांची व प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांची माहिती संकलित करणे.
२. १९९६ ते २००२ या कालखंडातील या यंत्रणांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.
३. या कालखंडातील प्रशिक्षणाचा लाभ घेतलेल्या मराठी माध्यमाच्या माध्यमिक शिक्षकांकडून या प्रशिक्षणाची उपयुक्तता जाणून घेणे.
४. या यंत्रणांच्या कार्यामधील त्रुटी व मर्यादा यांचा अभ्यास करणे.
५. सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबत असणा-या विविध घटकांच्या अपेक्षा जाणून घेणे.
६. या यंत्रणांच्या अधिक उपयुक्ततेसाठी सूचना व शिफारशी करणे.

**५) संशोधनाची गृहीतके :-**

१. या यंत्रणाकडून सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबत माध्यमिक शिक्षकांच्या काही अपेक्षा आहे.
२. सेवांतर्गत प्रशिक्षण घेण्यासाठी माध्यमिक शिक्षकांचा प्रतिसाद मिळतो.
३. विविध यंत्रणाव्दारे माध्यमिक शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षणाचे उपक्रम सुरु आहेत.

४. या प्रशिक्षण यंत्रणांच्या बाबतीत कार्यरत असणा-या विविध यंत्रणांना काही अडचणी व त्रृटी जाणवतात.

**६) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

व्याप्ती :- विषयाची व्याप्ती संपूर्ण राज्य स्तरावर असली तरी प्रस्तुत संशोधनासाठी त्याची मर्यादा अहमदनगर जिल्हयातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळांतील शिक्षकापुरतीच आहे. त्यामुळे यातून प्राप्त होणारी माहिती व निष्कर्ष हे जिल्हयापुरतेच मर्यादित असतील.

१. मर्यादा :- अ) प्रस्तुत संशोधन हे मराठी माध्यमाच्या शाळांतील सर्व विषयांच्या शिक्षकांना लागू पडेल.

ब) या संशोधनात फक्त १९९६ ते २००२ या कालखंडातील सेवांतर्गत प्रशिक्षणाचा आढावा घेतला आहे.

क) या संशोधनात जिल्हा परिषद (माध्यमिक विभाग) व विस्तर सेवा केंद्र या सेवांतर्गत प्रशिक्षण देणा-या यंत्रणांचाच अभ्यास केला आहे.

ड) प्रस्तृत संशोधनात अहमदनगर जिल्हयातील अनुदानित व मराठी माध्यमाच्या शाळांचा विचार केला आहे.

इ) या संशोधनात संशोधकाने फक्त इ.९वी व १०वी या वर्गांना अध्यापन करणा-या शिक्षकांचा विचार केलेला आहे.

ई) प्रस्तुत संशोधनाची गरज लक्षात घ्त्रेता प्रश्नावल्या, मतावली, मुलाखती, क्षेत्रीय भेटी, शेकडेवारी याच साधनांचा वापर केलेला आहे.

फ)प्रस्तुत संशोधनातून नवोदय विदयालये, आदिवासी शाळा, विदया निकेतने, निवासी शाळा, आश्रम शाळा, विशेष शाळा, राज्य शाळा, सैनिकी शाळा, केंद्रीय शाळा वगळण्यात आल्या आहेत.

ब) संशोधकाने तयार केलेली संशोधन साधने ही स्वानुभव व तज्ज्ञांशी चर्चा करुन त्यांचे मार्गदर्शन घेउन तयार केलेली आहेत.

**७) संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

**८) नमुना निवड :-**

अहमदनगर जिल्हयातील एकूण ५३५ माध्यमिक अनुदानित शाखा आहेत. (२००५-०६ च्या जिल्हा परिषद माध्यमिक विभाग यादीनुसार) प्रस्तुत संशोधनासाठीचा नमुना पुढील प्रमाणे निवडला

| | |
|---|---|
| १. सेवांतर्गत प्रशिक्षण यंत्रणा | २ यंत्रणा |
| (जिल्हा परिषद माध्यमिक विभाग व विस्तार सेवा केंद्र) (प्रश्नावली) | |
| २. सेवांतर्गत प्रशिक्षण घेतलेले शिक्षण | |
| अ) जिल्हा परिषद (माध्यमिक विभाग) (प्रश्नावली) | २३७ शिक्षक |
| ब) विस्तार सेवा केंद्र (प्रश्नावली) | १५२ शिक्षक |
| ३. तज्ज्ञ मार्गदर्शक (मतावली) | ५० तज्ज्ञ मार्गदर्शक |
| ४. मुख्याध्यापक (मतावली) | ५० मुख्याध्यापक |

५. शैक्षणिक संस्था (मुलाखती) १८ संस्थाचालक

**९) संशोधनाची साधने :-**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने पुढील साधने वापरली आहेत.

१. प्रश्नावली २. मतावली ३. मुलाखती

४. प्रशिक्षण यंत्रणा भेटी ५. निरीक्षणे ६. संख्याशास्त्रीय साधने - शेकडेवारी

**१०) संशोधनाची निष्कर्ष :-**

परस्तुतसंशोधनाचीउद्दिदीष्टांप्रमाणे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

**उद्दिष्ट क्र.१**-अहमदनगर जिल्हयातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शिक्षकांनी जिल्हापरिषद (माध्यमिक विभाग) व विस्तार श्सेवा केंद्र या सेवांतगर्गत प्रशिक्षण यंत्रणांची व प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांची माहिती संकलित करणे

१. जिल्हा परिषद (माध्यमिक विभाग) या यंत्रणेच्या माध्यमातून सर्वात जास्त (२६७) शिक्षकांनी सेवांतर्गत प्रशिक्षण घेतले आहे.

२. विस्तारसेवा केंद्र या यंत्रणेच्या माध्यमातून कमी (१५१ शिक्षकांनी ) प्रशिक्षण घेतले आहे.

**उद्दिष्ट क्र.२**- १९९६ ते २००२ या कालखंडातील या यंत्रणांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे

१. जिल्हा परिषद (माध्यमिक विभाग) विस्तार सेवा केंद्र या दोन्ही यंत्रणा शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्नशील आहेत.

२. या दोन्ही यंत्रणा तज्ज्ञ मार्गदर्शक मिळविण्यासाठी शिक्षक संघटनांची मदत घेतात.

३. यंत्रणांना शिक्षक प्रशिक्षणासाठी पुरक साहित्य तयार करण्यास पुरेसा वेळ मिळत नाही.

४. सेवांतर्गत प्रशिक्षणा बरोबरच विस्तार सेवा केंद्राने संस्कृत विषय शिक्षक संघटनेची स्थापना तसेच अन्य विषय शिक्षक संघटनांचे पुनरुज्जीवन केले आहे.

**उद्दिष्ट क्र.३**- या कालखंडातील प्रशिक्षणाचा लाभ घेतलेल्या मराठी माध्यमाचय माध्यमिक शिक्षकांकडून या प्रशिक्षणाची उपयुक्तता जाणून घेणे.

१. जिल्हा परिषद (माध्यमिक विभाग) यंत्रणणेचे प्रशिक्ज्ञण सर्वात जास्त (१२६ शिक्षकांना) प्रभावी वाटले तर विस्तार सेवा केंद्र या यंत्रणेचे (९५ शिक्षकांना) प्रभावी वाटले. (कोष्टक क्र. २५ पृष्ठ७२१३)

२. सेवांतर्गत प्रशिक्षणानंतर या यंत्रणाव्दारे प्रशिक्षकानीं मिळविलेल्या माहितीचे मूल्यमापण लेखी परीक्षेव्दारे केले जाते असे सर्वात जास्त ६४ टक्के प्रशिक्षकांचे मत आहे. (कोस्टक २१, पृष्ठ २१३)

३. प्रशिक्षण वर्गातून मिळालेल्या माहितीचा शिक्षकांना आपल्या अध्यापनात चांगल्या प्रमाणात उपयोग होतो असे सर्वात जास्त शिक्षकांचे मत आहे. (आलेख क्र.५, पृष्ठ - २१८)

४. सर्वात जास्त प्रशिक्षणार्थीच्या मतानुसार प्रशिक्षणाचा कालावधी ६ ते १० दिवसांचा आसावा. (आलेख क्र. २, पृष्ठ १८८)

**उद्दिष्ट क्र.४-** या यंत्रणांच्या कार्यामधील त्रुटी व मर्यादांचा अभ्यास करणे

१. भौतिक सुविधांनी परिपूर्ण असणारी एकही यंत्रणा नाही. प्रत्येक यंत्रणेमध्ये कमी-जास्त प्रमाणात भौतिक सुविधांचा अभाव आढळून येतो असे १०० टक्के यंत्रणांचे मत आहे.

२. प्रशिक्षण केंद्रावर भौतिक सुविधांबाबत अडचण असल्यास स्थानिक शाळेची मदत घेउन समस्या सोडवली जाते.

३. यंत्रणांना तज्ज्ञ मार्गदर्शक मिळण्यास नेहमी अडचणी येतात.

४. प्रचलित सेवांतर्गत वर्गामध्ये प्रशिक्षणाचा हेतू व उद्दिष्टांकडे दुर्लक्ष केले जाते.

**उद्दिष्ट क्र.५-** सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबत विविध घटकांच्या असणा-या अपेक्षा जाणून घेणे.

समन्वयक म्हणून यंत्रणेकडून / केंद्राकडून अपेक्षा ७

१. यंत्रणांनी सेवांतर्गत प्रशिक्षणाची सोय उत्तम प्रकारची करावी

२. जास्तीत जास्त शिक्षकांना प्रशिक्षणाचा लाभ मिळवून दयावा.

३. यंत्रणांनी विविध विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित करावे.

४. यंत्रणांनी प्रशिक्षण वर्गासाठी अदययावत साधनांचा वापर करावा.

**उद्दिष्ट क्र.६** - या दोन यंत्रणांच्या अधिक उपयुक्ततेसाठी सूचना व शिफारशी करणे

१. यंत्रणांनी प्रशिक्षणापूर्वी शिक्षकांच्या गरजांचे योग्य पध्दतीने सर्वेक्षण करावे

२. यंत्रणांनी सेवातर्गत प्रशिक्षणामध्ये अधिकाधिक दृक-श्राव्य साधनांचा वापर करावा

३. मुख्याध्यापकांनी अप्रशिक्षित शिक्षकांची माहिती वेळोवेळी यंत्रणांना देउन त्याना प्रशिक्षणासाठी पाठविले जावे.

४. तज्ज्ञ मार्गदर्शकांनी आधुनिक तंत्रज्ञानाविषयी माहिती आत्मसात करुन शिक्षकांना दयावी.

५. शैक्षणिक संस्थानी शिक्षकांच्या गरजेनुसार संस्थापातळीवर प्रशिक्षणवर्ग आयोजित करावे.

६. शासनाने नवीन अभ्यासक्रम अमलात येण्याअगोदर शिक्षकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करावी.

## ११) संदर्भ साहित्य सूची :-


१. मुळे, रा.श., व उमाठे, वि.तु. (१९९८). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे (तिसरी आवृत्ती). औरंगाबाद:विदया बुक्स.

२. भिंताडे, वि.रा. (१९८९). शैक्षणिक संशोधन पध्दती (प्रथमावृत्ती). पुणे : नुतन-प्रकाशन

३. बेलकर, आर.डी.(१९९९, ऑक्टोबर, नोव्हेंबर). २१ व्या शतकातील शिक्षक - शिक्षण, शिक्षण समीक्षा

४. महाराष्ट् राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद. (२००३-२००४). वार्षिक अहवाल, पुणे : ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग.